
# भास्कर चंदनशिव यांची कथा : एक अवलोकन

**प्रा.डॉ.भगवान नन्नावरे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय,
नागपूर.




**प्रास्ताविक :**

ग्रामीण साहित्याच्या पहिल्या पिढीतील एक महत्त्वाचे कथाकार म्हणून भास्कर चंदनशिव यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. ग्रामीण माणसाविषयी, तिथल्या जगण्याविषयी त्यांना नेहमीच आदर वाटत आलेला आहे. व्यक्तीच्या जगात असंख्य गोष्टी घडत असतात आणि संवेदनशील माणूस म्हणून आपण त्या गोष्टीकडे पाहिले पाहिजे, त्यावर चिंतन केले पाहिजे हा विचार सातत्याने उराशी बाळगून भास्कर चंदनशिव नेहमी आग्रही राहिलेले आहेत. साहित्य निर्मितीचे मूळ हे आपल्या जीवनात आहे. त्यामुळे आपल्या जीवनाविषयी, आपल्या समाजाविषयी आपण बोलले पाहिजे, लिहिले पाहिजे ही लेखनाविषयीची प्रामाणिक भूमिका त्यांनी आपल्या कृतीउक्तीतून सातत्याने दाखवून दिलेली आहे.

भास्कर चंदनशिव हे नाव ग्रामीण कथेच्या अनुषंगाने प्रामुख्याने घेतले जाते. चंदनशिव यांनी अल्प स्वरूपातच कथा लिहिली. परंतु स्वत:ची एक वेगळी ओळख त्यांनी निर्माण करून ठेवलेली आहे. त्यांच्या एकूणच कथा लेखनातून महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यात पडणाऱ्या दुष्काळाविषयी, ग्रामीण माणसांची दिवसेंदिवस होत जाणारी मुस्कटदाबी, शेती आणि शेतकरी यांची होणारी दशा, ग्रामीण समाज जीवनात होणारे बदल आणि त्यातून लोप पावत चाललेली ग्रामीण संस्कृती, ऊस उत्पादक शेतकरी आणि त्याच्या आयुष्याची होणारी हेळसांड त्याचबरोबर शेती व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या रोजगारी वर्गाची दिवसेंदिवस होत जाणारी परवड अशा एक ना अनेक प्रश्नातून चंदनशिव यांची कथा सभोवतालच्या ग्रामीण वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण दर्शविते. ग्रामीण जीवनाचे भाष्यकार भास्कर चंदनशिव यांच्या कथा विश्वाचा धांडोळा प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने घेता येईल.

भास्कर चंदनशिव यांचा जन्मच मुळात दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उस्मानाबाद जिल्ह्यात झालेला असल्यामुळे बालवयापासूनच त्यांनी उघड्या, बोडक्या दुष्काळी भागातील तीव्र जीवनजाणिवा आत्मसात केलेल्या होत्या. आपल्या या धगधगत्या जीवन वास्तवातून चंदनशिव यांनी १९७० पासून कथालेखनाला सुरुवात केली. त्यांचा पहिला कथासंग्रह १९८० साली 'जांभळंढव्ह' या नावाने प्रकाशित झाला. ग्रामीण महाराष्ट्राचे भयान वास्तव चंदनशिव यांच्या रूपाने सामोरे आले. प्रारंभीच्या कथालेखनातून आनंद यादव यांच्या कथालेखनाची छाप चंदनशिव यांच्या कथालेखनावर जाणवत असली तरी पुढे पुढे मात्र चंदनशिव यांच्या कथेची एक वेगळी ओळख मराठी वाचकांना झालेली आहे. भास्कर चंदनशिव हे नावच मराठी ग्रामीण कथेचे वेगळे भावविश्व अधोरेखित करण्यासाठी तसे सिद्ध झाले होते. ते सांगताना रा.रं.बोराडे लिहितात,''प्रा.भास्कर चंदनशिव यांनी प्रामुख्याने कथा लिहिल्या. मोजकचं कथालेखन करून मराठी साहित्यात ज्यांनी आढळ स्थान प्राप्त केलं, त्या कथा लेखकांपैकी भास्कर चंदनशिवे हे एक लेखक. त्यांची कथा स्वयंभु आहे. त्यांचा नामनिर्देश न करता त्यांची कथा माझ्यासारख्या त्यांच्या वाचकाला वाचावयास दिली. तरी ती कथा भास्कर चंदनशिव यांची आहे हे ओळखणे अवघड जाणार नाही.''[१] बोराडे यांनी भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनाचे वेगळेपण

अधोरेखित करताना त्यांच्या कथालेखनाचा विशेष याठिकाणी नोंदविलेला आहे. त्यामुळे भास्कर चंदनशिव हे मनाचा तळ शोधणारे लेखक म्हणून ओळखले जातात.

ग्रामीण माणसांच्या व्यथा वेदनांना बोलके करणारे भास्कर चंदनशिव ग्रामीण जगण्याशी एवढे तादात्म्य पावतात की, त्यांच्या अनेक कथा या ग्रामीण माणसाला स्वत:च्या वाटाव्यात इतक्या सखोलतेने उतरलेल्या आहेत. वास्तवाच्या मुशीतून साकारलेल्या चंदनशिव यांच्या कथा ग्रामीण माणसांचे भावविश्व साकार करून थांबत नाहीत तर ग्रामीण माणसांच्या या विनाशाला कारणीभूत असणाऱ्या वेगवेगळ्या कारणांची ते मांडणी करतात. तसेच या परिस्थितीला सामोरे जाणाऱ्या माणसांच्या व्यथा वेदना ही मुखर होतात. सभोवतालच्या परिघाला अधोरेखित करतानाच ग्रामीण साहित्याला दिशा देण्याची व त्याच्या मूळ भूमिकेशी प्रामाणिक राहण्याची जाणीवही भास्कर चंदनशिव सातत्याने करून देताना दिसतात. महात्मा फुले यांच्या विचाराचा खरा अन्वयार्थ भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनातून अभिप्रेत होताना दिसून येतो. भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनाची ही वेगळी ओळख अधिक ठळक करताना महावीर जोंधळे लिहितात,''१९८० नंतर महाराष्ट्राचे शेतकरी जीवन बदलत गेले. यात दुष्काळ, कर्जबाजारीपणा, शेतकरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आश्वासन देणाऱ्या राजकीय पक्षांची कमी झालेली विश्वासहर्ता, हरितक्रांतीमुळे शेतीतील उत्पन्न वाढले पण शेतकऱ्यांचे उत्पन्न मात्र वाढू शकले नाही. या सगळ्यांचा परिणाम शेतकरी असंतोषाच्या उंबरठ्यावर येण्यास कारणीभूत ठरला. नेमके याच काळात शेतकऱ्यांना राजकीय प्रश्नातून बाजूला काढून केवळ अर्थवादी प्रश्नांशी जोडण्याचा प्रयत्न केला. तो शेतकरी आंदोलनाने. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' चा खरा अर्थ शतकानंतर महाराष्ट्राच्या शेतकरी मनात रुजू लागलेला दिसू लागला की, आंदोलने भारतभर पसरत गेली. त्याचेच प्रतिबिंब या काळात लिहिल्या गेलेल्या ग्रामीण साहित्यातून दिसू लागले. (कथा लाल चिखल)''[२] जोंधळे यांनी भास्कर चंदनशिव यांची कथा समकाळातील वास्तव प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून अभिव्यक्त होते. त्याचबरोबर बदलत्या शेतकरी जीवनात नि त्याच्या मनात उद्‌भवणाऱ्या प्रश्नांनाही अधोरेखित करते हे स्पष्ट होते.

सभोवतालची माणसं, नात्याचा गोतावळा, बदलत जाणारी परिस्थिती, नवीन तंत्रज्ञानाने दिवसेंदिवस विकोपाला जाणारा शेती व्यवसाय, सर्वसामान्य शेतकऱ्यांची होणारी घुसमट, शहरीकरण, सहकार चळवळ, कारखानदारी, आदी क्षेत्रात वाढत जाणारा भ्रष्टाचार, प्रस्थापित विषमाधिष्ठीत समाजव्यवस्था असे एक ना अनेक विषय चंदनशिव यांच्या कथालेखनाचे परिमाण म्हणून सामोरे येतात. त्यांच्या कथालेखनातून साकार झालेला गाव, त्या गावातील संस्कृती, तिथले आचार—विचार सभोवतालचा परिसर, लोक परंपरा, सण—उत्सव यांची संस्कार शिल्पे त्यांच्या मनात कोरली गेलेली असल्यामुळे त्याचे प्रतिबिंब चंदनशिव यांच्या कथेत अलगदपणे उमटताना दिसून येते. ग्रामीण समाजात वावरणाऱ्या विविध स्त्रियाही चंदनशिव यांच्या कथेत ठळकपणे येतात. त्यांचे प्रत्येक स्त्री पात्र घुसमटत जीवन जगणारे असलेले दिसून येते. त्यांच्या कोणत्याच कथेतील स्त्री पात्र बंडखोर प्रवृत्तीने साकार होत नाही. परंपरागत जीवन जगणारी स्त्रीच त्यांच्या कथेतून उभी राहते. सामाजिक जाणिवेचे विविधांगी पदर चंदनशिव यांच्या लेखनातून साकार झालेले आहेत. साहित्य हे समाज जीवनाचे अविभाज्य अंग असते. याचा प्रत्यय त्यांच्या अनेक कथा लेखनातून वाचकाला येत राहतो. सामाजिक जीवन हे लेखकाच्या अनुभवाचा खूप मोठा परीघ व्यापणारे असते. त्यामुळेच त्यातून लेखकाच्या लेखनदृष्टीला नव्या विचारांची गती मिळत असते. लेखकाने याच सामाजिक वास्तवाला आपल्या अभिव्यक्तीतून सामोरे ठेवावे, ही अपेक्षा कशा पद्धतीने ठेवली जाते. याविषयी आनंद यादव म्हणतात,''सामाजिक जीवन हे सामान्यत: मानवी मनाला दिवसाच्या चोवीस तासांपैकी जवळजवळ अठरा वीस तास तरी व्यापून असते. आपल्या जगण्याचे बहुतेक प्रश्न सामाजिक वास्तवाशी निगडीत असतात. मनात चाललेल्या विचारात बहुतेक वेळा सामाजिक संदर्भच येत असतात. हे सामाजिक संदर्भ आपले बव्हंशी भौतिक जीवन आकाराला आणत असतात. फार म्हणजे फारच थोडा वेळ या सामाजिक वास्तवा पलीकडे जाऊन आपण रोमँटिक, अध्यात्मिक, आदर्शात्मक, मूल्यविषयात्मक सृष्टी, निसर्गविषयक इ. विचार करीत असतो. अशा प्रकारचे जीवन अर्थपूर्ण आणि प्रिय असले तरी तरल आणि विरळ ही असतात त्यामुळे साहित्याकडून पहिली मागणी सामाजिक वास्तवाची असते. त्याचाच एक भाग म्हणून साहित्याने बदलत्या सामाजिक वास्तवाचे व्यापक पातळीवर दर्शन घडवावे ही अपेक्षा केली जात असावी.''[३] आनंद यादव यांनी सामाजिक वास्तवाशी लेखक कसा एकरूप होतो, हे स्पष्ट करून त्याच्या लेखनातून सामाजिक वास्तवाचे व्यापक पातळीवर दर्शन घडविण्याची अपेक्षा कशा पद्धतीने व्यक्त केली

जाते, हे स्पष्ट केले आहे. भास्कर चंदनशिव यांच्या कथा लेखनातून याच पातळीवरचे सामाजिक वास्तव अभिव्यक्त होताना दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाच्या वतीने शिक्षणासंदर्भात जी धोरणे अमलात आली त्या धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत व समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न झाला. परिणामी, शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण मुलांच्या संख्येतही कमालीची वाढ झाली. शिक्षणाची कसलीच परंपरा नसणाऱ्या घरातील शेतकऱ्यांची मुले ही शिकू लागली. या परंपरेतूनच पुढे आलेल्या लेखकांपैकी भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे नाव आहे. भास्कर चंदनशिव यांनी कथालेखनावर अधिक भर दिला आहे. त्यांचे 'जांभळढव्ह', 'मरणकळा' १९८३, 'अंगारमाती' १९९१, 'नवी वारुळ' १९९२, 'बिरडं' असे एकूण पाच कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या एकूणच लेखनातून ग्रामीण समाजजीवन साकल्याने चित्रित झालेले आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि चिंतनाचा विषय असणारे अनेकविध पैलू त्यांच्या कथा लेखनातून प्रतिबिंबित होतात. त्यांच्या अनुभवविश्वाची मांडणी करताना डॉ.वासुदेव मुलाटे लिहितात, ''गावाकडची माणसं, गुरं—ढोरं, बैल बारदाना, कुत्रे, कोंबडे, गावाची अवघी वस्ती आणि शेतजमीन त्यांची बांधावरची झाडे, गावची पांदण आणि इतर शेतालगतच्या बोरी—बाभळी, विहिरी आणि ओढे—नाले, पशुपक्षी नि निसर्गही ते विसरले नाहीत. गावातल्या जुनाट मंदिरात उत्तररात्रीपर्यंत चालणारी भजनं आणि पहाट वाऱ्यावर स्वार होत ऐकू येणाऱ्या जात्यावरच्या ओव्या, मोटांचे आणि बांधावरून शेतमळ्यातून एकमेकाला घातलेल्या हाका, प्राण्यांचे आवाज, गावातली कुलंगडी, भांडणे, निवडणुकांच्या काळात चालणारे राजकारण आणि नंतरच्या काळात यातील जय—विजयच्या, पराभवाच्या पारावरच्या ओटयावरच्या गप्पा, गावच्या जत्रा आणि नवस—सायास, कग लग्नातील रुसवे—फुगवे दु:खातून जावं धावून जाणारी माणसे आणि त्यांनी दिलेला दिलासा असं खूप काही ते विसरू शकले नाहीत.''[४] मुलाटे यांनी भास्कर चंदनशिव यांची गाव मातीशी आणि तिथल्या एकूणच व्यवस्थेशी जोडली गेलेली नाळ किती विविधांगी स्वरूपाची होती ते स्पष्ट केले आहे. याचाच प्रत्यय त्यांच्या वरील पाच कथासंग्रहातील कथातून येतो.

जगण्याविषयीचा प्रामाणिकपणा, माणसाविषयीची ओढ, शेतकऱ्यांविषयी असणारा कळवळा, ग्रामीण माणसांच्या उद्धारासाठी असणारी धडपड, निसर्ग आणि मानवी जीवन यांच्याविषयीची एकरूपता, मानवी मनाचे अंत:प्रवाह शोधण्याची प्रवृत्ती, विविध मनोवृत्तीच्या व्यक्तिरेखांचे चित्रण, प्रतिमा—प्रतीकांची मुक्त उधळण, जीवन जाणिवा समृद्ध करण्याविषयीचा प्रामाणिकपणा, शोषितांच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी असलेला विचार अशा एक ना अनेक वैशिष्ट्यांनी त्यांच्या कथा समृद्ध झालेल्या आहेत. त्यांच्या या लेखन वैशिष्ट्यांमुळेच ते समकालीनात आपले भिन्नत्व तर राखतातच त्याचबरोबर कथेच्या सर्वच घटक अंगात भास्कर चंदनशिव यांची एक वेगळी नाममुद्रा उमटलेली दिसून येते. भास्कर चंदनशिव यांच्या कथा लेखनाच्या विविधांगावर प्रकाश टाकताना मथु सावंत लिहितात,''चंदनशीव यांनी आपल्या साहित्यकृतीतून मानवी मनाचा, त्याच्या नंतर गावाचा साकल्याने शोध घेतला आहे. आरंभीची रंजकतेची पायवाट सोडून देऊन ग्रामीण जीवनातील विविध समस्यांचा वेध यांच्या कथेने घेतला आहे. पात्रांच्या स्वभावाचे केवळ बाह्य विश्लेषण न करता चंदनशिव यांनी त्यांच्या मनोविश्लेषणावर भर दिला. त्यामुळे ग्रामीण कथेला वेगळे परिमाण प्राप्त झाले. सरपंच, पाटील, जमीनदार, छोटे—मोठे शेतकरी, शेतमजूर, शोषित कष्टकरी, अन्यायाला बळी पडणाऱ्या स्त्रिया अशा वेगवेगळ्या स्तरातील व्यक्तिरेखा त्यांच्या कथांमधून साकारतात. ग्रामीण भाषेच्या जोडीला निखळ व सुंदर प्रतिमा सृष्टी निर्माण करून पात्रांच्या अंत:करणात खोल उतरण्याचे सामर्थ्य चंदनशिव यांच्या शब्दकळेत आहे. मानवी मनाच्या विविध भावमुद्रा त्यांच्या कथेतून दिसून येतात.''[५] सावंत यांनी भास्कर चंदनशिव यांची कथा विविधात्मकतेतून कशी परिपूर्ण होत गेली आहे, ते नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. भास्कर चंदनशिव यांचा कोणताही कथासंग्रह वाचकाला याच अंगाने मोहित करून सोडणारा आहे. म्हणूनच दुसऱ्या पिढीतील ते एक महत्त्वाचे कथाकार म्हणून ओळखले जातात.

## समारोप :

अशाप्रकारे सारांश रूपाने शेवटी सांगता येते की, चंदनशिव यांची कथा ही ग्रामीण सभोवतालाला घेऊन अभिव्यक्त होते. ग्रामीण जगण्याविषयीचा प्रामाणिकपणा आणि ग्रामीण विशेषत: शेतकऱ्यांविषयीच्या विविध प्रश्नावर भास्कर चंदनशिव यांची कथा नेमकेपणाने बोट ठेवते. कथा लेखनाच्या वेगवेगळ्या पैलूंना

केंद्रस्थानी ठेवून कथालेखन केल्यामुळे त्यांची प्रत्येक कथा ही वाचनीय झालेली आहे. वाचक, अभ्यासक, समीक्षक यांना विविधांगी विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या सशक्त कथा लेखनाने भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे कथाकार ठरलेले आहेत.

## संदर्भ :


१. रा.रं.बोराडे, प्रतिष्ठान, नोव्हें–डिसें.२००६, जाने–फेब्रु २००७, पृ.३०.
२. महावीर जोंधळे, अंगारमाती संबंधी, अंगारमाती, भास्कर चंदनशिव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. १९९७.
३. आनंद यादव, ग्रामीण साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ.१९८१, पृ.५८.
४. डॉ.वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२००५,पृ. १९४.
५. मथू सावंत, कथाकार भास्कर चंदनशिव, संगत प्रकाशन, नांदेड, प्र.आ.२००४, पृ.३३१.